# सृष्टिज्ञान

**संस्थापक :**
कै.प्राचार्य गो. रा. परांजपे
कै. डॉ. दि. धों. कर्वे
कै. प्रा. स. बा. हुदलीकर

**मार्गदर्शक :**
डॉ. रघुनाथ माशेलकर
डॉ. अनिल काकोडकर
डॉ. विजय भटकर
डॉ. शेखर मांडे

**सल्लागार :**
ले. ज. डॉ. माधुरी कानिटकर (निवृत्त)
डॉ. भूषण पटवर्धन

**संचालक :**
डॉ. योगेश शौचे
डॉ. मानसी माळगांवकर
डॉ. क. कृ. क्षीरसागर
श्री. र. वि. कुलकर्णी

**संपादक :** रमेश दाते

**सहसंपादक :**
डॉ. प्रभाकर इंगळे, सत्यजित जोशी

**मुखपृष्ठ मांडणी व सजावट :**
मिलिंद जोशी, अनुपम क्रिएशन्स, पुणे

या अंकाची किंमत : रु. ४०.००
वार्षिक वर्गणी : रु. ४००.००

**पत्रव्यवहाराचा पत्ता :**

'सृष्टिज्ञान', c/o विज्ञान भारती
काशी निवास, सुभाषनगर गल्ली क्र.६,
१२६१ शुक्रवार पेठ, पुणे ४११००२.
फोन नं.: ०२०–२४४७४२९५
ई–मेल : sci.vibha@gmail.com



या अंकातील लेख त्या त्या विषयांतील तज्ज्ञांनी लिहिलेले आहेत. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.


# दिवस सुख-दुःखाचे



विज्ञान विश्वातील, नुकतीच घडलेली, अत्यंत दु:खद घटना म्हणजे प्रा. डॉ. सौ. मंगला नारळीकर यांचे निधन त्यांनी पदव्युत्तर शिक्षण पार करतांना विशेष प्राविण्य मिळविले होते. प्रारंभी मुंबई येथील ''टाटा इन्स्टिट्युट ऑफ फंडामेंटल रिसर्च'' या संस्थेत संशोधक म्हणून काम केल्यानंतर, त्यांनी अध्यापन क्षेत्रात दीर्घकाळ कार्य केले. नंतर त्यांनी गणितासारखा रटाळ भासणारा विषय विद्यार्थ्यांना आवडीचा व रंजक कसा होईल यासाठी विशेष परीश्रम घेतले. विद्यार्थ्यांबाबत वाटणारी आत्मियता व साध्या सोप्या भाषेतून विज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत नेण्यासाठी त्यांनी जीवनभर केलेले कार्य अलौकिक आहे. त्यांचे कार्य राष्ट्रीय स्तरावर नावाजले गेले.

१९ आणि २० जुलै रोजी बंगळुरु येथील भारतीय विज्ञान साहित्य अभ्यास संघाने दोन दिवसीय कर्यक्रम मंगलाताईंना समर्पित केला त्याचे हे एक प्रातिनिधिक उदाहरण आहे. विज्ञान व गणित या विषयांव्यतिरिक्त त्यांना चित्रकला, मूर्तिकला, संगीत या विषयांचीसुध्दा आवड होती. त्यांची अनेक पुस्तके प्रकाशित झाली, पुरस्कारही अनेक मिळाले. डॉ. जयंत नारळीकर व त्यांचे पिताश्री डॉ. वि. वा. नारळीकर यांचे सृष्टिज्ञानच्या वाटचालीत मोठेच योगदान आहे. मात्र मंगलाताईंच्या क्षमतेचा उपयोग 'सृष्टिज्ञान' ने नीटसा करून घेतला नाही, याची खंत वाटते. मंगलाताईंच्या बहुआयामी व्यक्तिमत्वाला सृष्टिज्ञानतर्फे भावपूर्ण आदरांजली.

२३ ऑगस्ट रोजी आपले चंद्रयान –३ चंद्रावर हळुवार उतरले (soft landing) आणि भारत चंद्रावर उतरणारा चौथा तर चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरणारा पहिला देश ठरला. त्याबद्दल मी सर्वप्रथम इस्रोचे अभिनंदन करतो. ही चांद्र मोहीम भारतासाठी अत्यंत महत्वाची आहे. या मोहिमेमध्ये अनेक बाबींचा अभ्यास होणार आहे.


SRISHTIDNYAN (RNI No. 21321/1973)
"Srishtidnyan" Monthly magezine owned by Vidnyan Bharati, Pune, Printed and published by Ramesh Date. Printed at Pratima Mudran, Kothrud Industrial Area, Kothrud, Pune - 411038. Published at 1261, Shukrawar Peth, Subhashnagar, Pune - 411002.
Editor - Ramesh Date

चंद्रभूपृष्ठाखाली असणारी उपयुक्त मूलद्रव्ये तसेच जड मूलद्रव्यांचे उत्खनन भविष्यात शक्य आहे का, हा त्याचा एक भाग. ही मूलद्रव्ये भविष्यात पृथ्वीवर आणून मानवाचे राहणीमान सुधारणे शक्य होईल,असे संशोधकांना वाटते.

चंद्राच्या ध्रुवांजवळ व अंधाऱ्या भागांवरील घळींमध्ये गोठलेल्या अवस्थेत पाणी आढळले आहे. चंद्रावर वसाहत स्थापन करतेवेळी त्याचा कितपत वापर करता येईल याचा अभ्यास हे देखील या मोहिमेचे एक उद्दिष्ट आहे. तसेच चंद्रावरील पाण्यातून प्राणवायू  वेगळा करून सुदूर अंतराळ मोहिमांच्यावेळी (मंगळ मोहीम व त्याहून दूरच्या अंतराळ मोहिमा) इंधन तयार करण्यासाठी त्याचा वापर करता येईल का याचा अभ्यास करायचा आहे.

चंद्राभोवती फिरते अंतराळ स्थानक स्थापन करून तेथून चंद्रभूमीवर जाऊन वैज्ञानिक प्रयोग करण्याची शक्यता आजमावून पाहायची आहे. भविष्यात हीच पद्धत मंगळावर वैज्ञानिक प्रयोग करण्यासाठी वापरायची आहे, त्यामुळे चंद्र व मंगळ यांचेकडे येण्याजाण्याच्या खर्चात बचत होईल. त्याचबरोबर चंद्रावर वसाहत करण्याच्या शक्यतांच्या अभ्यासालाही ही मोहीम हातभार लावेल.

मंगळावर वसाहत करण्यापूर्वी चंद्रावर वसाहत करून काय अडचणी येतात याचा अभ्यासही या मोहिमेतहोणारआहे

कोंबडी आधी की अंड आधी ही समस्या आता शास्त्रज्ञांनी सोडविली आहे. तशीच दुसरी एक समस्या जिज्ञासुंना साद घालीत आली आहे.

ती समस्या म्हणजे बीज व फळ यांची निर्मिती क्रिया. बी पासून वृक्ष तयार झाल्यावर अखेरीस परत फळ तयार होते जे पुढील पिढीसाठीच्या बीजाची जपणूक करते. या बीजातूनच परत वृक्ष होणार असतो. नेहमी असा प्रश्न पडतो की, बीजापासून वृक्षनिर्मितीच्या प्रक्रिया व नंतर होणारी फलनिर्मिती / बीज निर्मिती या प्रक्रिया बरोबर एकमेकांच्या उलट असतात का? म्हणून हा प्रश्न मी आपल्या गटात विचारला होता. त्याचे तज्ज्ञांकडून चांगले स्पष्टीकरण आले आहे. या अंकातील दोन लेख – बीज अंकुरे, अंकुरे, बी पासून बी पर्यंत हे नक्कीच कुतूहलपूर्ती करतील.

अजून एक घडलेली सुखद घटना म्हणजे ऑगस्ट महिन्याच्या ‘लोकमान्य टिळक’ विशेषांकाचे प्रकाशन, लोकमान्यांच्या अप्रकाशित बाबींवर लक्ष केंद्रित असलेल्या या अंकाचे चांगले स्वागत झाले. जाणकारांनी अंकाचे कौतुक केले आहे. मात्र ती घटना सुखद नसून, या निमित्ताने टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील ग्रंथालयाचे मदतीने लोकमान्यांच्या अनेक पैलूंचा अभ्यास करता आला ही खरी सुखद घटना होती. विज्ञान भारतीने लोकमान्य टिळकांचे कार्यावर आधारित अशी विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित केली आहे. तसेच एखादी छोटी चित्रफीत/व्लॉग बनविण्याचे आवाहन केले आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांना खूप खूप शुभेच्छा..!

सृष्टिज्ञान हळूहळू पूर्वस्थितीला येत आहे. शाळांनी वर्गणीदार होण्याचे प्रमाण वाढत आहे त्यामुळे दिवाळी अंकात विद्यार्थ्यांनी लिहिलेले दोन छोटे लेख छापण्याचा मनसुबा आहे. तसेच आगामी काळात दरमहा विद्यार्थ्यांसाठी दोन पृष्ठे राखीव ठेवण्याचा विचार आहे तरी विद्यार्थ्यांना विशेष आवाहन आहे की त्यांनी लिहीते व्हावे, योग्य लिखाणास जरूर प्रसिध्दी दिली जाईल.

**रमेश दाते**
sci.vibha@gmail.com

SRISHTIDNYAN (RNI No. 21321/1973)
‘सृष्टिज्ञान’ हे मासिक मालक विज्ञान भारती पुणे यांचे साठी मुद्रक व प्रकाशक रमेश दाते यांनी प्रतिमा मुद्रण, कोथरुड इंडस्ट्रियल एरिया, कोथरुड, पुणे ४११०३८ येथे छापून विज्ञान भारती १२६१ शुक्रवार पेठ, काशी निवास, सुभाषनगर, गल्ली क्र.६, पुणे ४११००२ येथे प्रसिध्द केले.
संपादक : रमेश दाते